# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

दि. २२ फेब्रुवारी, २०१७

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

### विषय :– न्यासासाठी वाहन खरेदी

शासन निर्णय, दि. ०६ जानेवारी, २०१७ अन्वये श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासासाठी वाहन खरेदी करण्यास शासनाची परवानगी प्राप्त झाली आहे. याअनुषंगाने **मे. मारुति सुजूकी, मे. हुंडाई व मे. होंडा या वाहन उत्पादक/वितरक यांच्याकडून** खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संदर्भात अधिक माहितीची आवश्यकता असल्यास न्यासाचे प्रभारी व्यवस्थापक, श्री. पी. टी. सांडिम यांच्याशी संपर्क साधावा.

अटी व शर्ती :–

अ) **खरेदी करावयाच्या वाहनाची रक्कम ही, वाहनाची किमंत + विक्रीकर+ टेम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + मुल्यवर्धित कर + सहाय्यभूत साहित्य (एक्सेसरीज) इ. अंर्तभूत करुन एकूण रु. ६ लक्ष/– एवढी राहील.**

ब) प्रत्येक निविदाकाराने फक्त एक दरपत्रक सादर करावे.

क) निविदाकाराने वॅट/सीएसटी क्रमांक दरपत्रकात नमूद करावा.

ड) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर वाहनाची डिलीवरी देण्यास लागणारा कालावधी व मूल्य स्पष्टपणे नमूद करावे.

इ) सीलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

ई) दरपत्रके सीलबंद लखोटयात शुक्रवार, दि. ०३ मार्च, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावी.

उ) सिलबंद लिफाफे **दि. ०३ मार्च, २०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजता** उघडण्यात येतील.

( संजीव पाटील )
कार्यकारी अधिकारी